# पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण कार्यालय,
# चालक पोलीस शिपाई भरती-२०२१

## जाहीर प्रकटीकरण

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण चालक पोलीस शिपाई भरती-२०२१ मधील तात्पुरत्या निवडयादीमध्ये समावेश असलेल्या खालील नमुद उमेदवारांची मुळ कागदपत्र पडताळणी, दि.१३/०५/२०२३ रोजी वैद्यकिय तपासणी झालेली असल्याने त्यांना चालक पोलीस शिपाई पदाचे नियुक्ती आदेश स्वीकारण्यासाठी व हजर होणेसाठी दिनांक १५/०५/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे गामीण येथे उपस्थित राहण्याचे कळविलेले होते. परंतु सदरील उमेदवार उपस्थित राहिलेले नाहीत.

त्यामुळे नमुद उमेदवार यांना चालक पोलीस शिपाई पदाचे नियुक्तीचे आदेश स्विकारुन हजर होणेसाठी दुसरी संधी देवुन दि.२५/०५/२०२३ रोजी, तिसरी संधी देवुन दि.२६/०५/२०२३ रोजी तसेच तदनंतर शेवटची संधी देण्यात येवुन दि.२९/०५/२०२३ रोजी उपस्थित राहणेबाबत तसेच हजर होणेस इच्छुक नसल्यास त्याप्रमाणे इकडील कार्यालयास लेखी स्वरुपात अर्जाद्वारे कळविणेबाबत तसेच आदेश स्विकारुन हजर न झाल्यास आपले नाव रद्द करुन आपले जागेवर प्रतिक्षायादीवरील उमेदवारास घेण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी असे ई-मेल अन्वये कळविण्यात आलेले होते. तथापी सदरील उमेदवार हे नियुक्तीचे आदेश स्वीकारण्यासाठी हजर राहिलेले नाहीत अथवा इच्छुक नसलेबाबत त्यांनी कोणत्याही प्रकारे इकडील कार्यालयास काहीही कळविलेले नाही.

| अ.क्र. | चापोशि उमेदवाराचे नाव | चेस्ट क्रमांक |
|---|---|---|
| १ | निलु गिरजेश यादव | २४२९ |

वरील नमुद उमेदवार यांना उपस्थित राहण्याची वेळोवेळी पुरेश्या ४ संधी देवुनही ते उपस्थित न राहिल्याने त्यांना भरती प्रक्रियेमध्ये समाविष्ट होणेबाबत स्वारस्य नाही, असे स्पष्ट दिसुन येत असल्याने त्यांना अपात्र करण्यात येत आहे व प्रतिक्षायादीमधील पुढील उमेदवारांना निवड यादीमध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. यापुढे वरील उमेदवार यांनी सदर पदाबाबत केलेला कोणताही हक्क/ दावा/तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण - ठाणे ग्रामीण
दिनांक - ०१/०६/२०२३

पोलीस अधीक्षक
ठाणे ग्रामीण